# <u>प्रेसनोट</u>

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/५०९७/२०१९ पुणे शहर, दिनांक – ०७.०६.२०१९

**विषय :- वाहतुकीच्या विरुध्द दिशेने वाहन चालविणा-या वाहनचालकांवर कलम- २७९ भा.द.वि. प्रमाणे खटले दाखल केले बाबत.**

--------oo--------

पुणे शहरातील अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरीता व वाहतूक सुरळीत व सुरक्षित चालणेकरीता वाहतूक शाखेकडून वारवांर वेगवेगळया कलमाखाली विशेष मोहिमांचे आयोजन केले जाते.

पुणे शहरात अपघात टाळणेसाठी व वाहतूकीस शिस्त लागणेसाठी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दिलेल्या सुचनांवरुन पोलीस उप आयुक्त,वाहतुक, पंकज देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहर वाहतूक शाखेतर्फे दिनांक ०६.०६.२०१९ रोजी रहदारीत हयगयीने,बेदरकारपणे व वाहतुकीच्या विरुध्द दिशेने वाहन चालविणा-या एकुण **६७ वाहनचालकांवर कलम- २७९ भा.द.वि. प्रमाणे** पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याप्रमाणे वाहतुकीच्या विरुध्द दिशेने, वाहन चालविणारे वाहनचालकांविरूध्द विशेष मोहिम यापुढेही चालू राहणार आहे.

नागरीकांना याद्वारे असे आवाहन करण्यात येते की, वाहन चालविताना हयगयीने व बेदरकारपणे वाहन चालविल्यामुळे अपघात होत असून त्याप्रमाणे वाहने चालवू नये, सदरच्या अपराधाबाबत ६ महीन्या पर्यंतचा कारावास व १०००/- रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतुद आहे. तसेच वाहतुकीच्या समस्ये बाबत पुणे शहर वाहतुक शाखेच्या व्टिटर अकाऊंट,व्हॉटस्अप मोबाईल क्र.८४११८००१०० वर,सतर्क पुणेकर ॲप,वाहतुक विभागांचे ट्रॅफिक क्बल व्हॉटस्अप ग्रुपवर तक्रारी/सुचना कराव्यात व वाहनचालकांनी वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करून वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

**(सही/-)**
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक,
पुणे शहर.

**प्रत** :- सर्व संबधितांना